

वैष्णव ठाकूर याचे अभिनंदन करताना संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, नानासाहेब टाकळकर.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत ठाकूरला रौप्यपदक

राजगुरुनगर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याने रौप्यपदक पटकावले. ९६ किलो वजनी गटात हे यश संपादन केले. यामुळे वैष्णव ठाकूर याची एप्रिलमध्ये विद्यापीठांतर्गत होणाऱ्या खेलो इंडिया खेलो स्पर्धेकरिता निवड निश्चित झाली आहे. चंदीगड विद्यापीठ मोहाली येथे दि. ८ ते १२ मार्च २०२२ रोजी ही स्पर्धा पार पडली. या यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते वैष्णव याचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी संचालक सतीश नाईकरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रंथपाल प्रा. पी. व्ही. तापकीर आदी उपस्थित होते. संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी वैष्णवला संस्थेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन केले. तर राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले.